# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

वनवर्धन, प्रधान डाकघरासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३

कार्यालय-०२३१/२६५३६३२, निवास-२६५३६३४, फॅक्स-२६५१२३३ E-mail u cchkolhapur@gmail.com

पत्र

क्रमांक कक्ष-४-१/आस्था/१५-१६/ ४२-६२
कोल्हापूर, दिनांक ९/१२/२०१५

प्रति,

उपवनसंरक्षक,
सावंतवाडी वन विभाग, सावंतवाडी

विषय :- <u>२५/२ चे दाखल्याबाबत..</u>

संदर्भ :- १. महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५/५
२. महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४ सुधारित १९८८
३. सावंतवाडी दोडामार्ग तालुक्यातील सर्व शेतकरी व ग्रामस्थ,व्यवसायिक यांचे दिनांक ३/१२/२०१५ चे निवेदन.
४. आपलेकडील पत्र क्र. ब/कक्ष-३/संकिर्ण-१/१५-१६/६०१३, दि.५/१२/१५

उपरोक्त संदर्भिय विशयाचे अनुषंगाने माझे कायदेशीर अभिमत / सनदशीर मार्गदर्शन खालील प्रमाणे :-

१. वृक्षतोड नियमनाबाबत खालील दोन कायदेशीर तरतुदी आहे. अ) महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम, १९६४ (संक्षिप्ताकरिता येथून पुढे <u>"वृक्षतोड अधिनियम"</u> असा उल्लेख केलेला आहे.) आणि ब) महाराष्ट्र जमिन महसूल (वृक्षासंबंधी हक्काचे नियमन) नियम, १९६७ (संक्षिप्ताकरिता येथून पुढे <u>"१९६७ चे नियम"</u> असा उल्लेख केलेला आहे). या दोन्ही कायदेशीर तरतूदी फक्त मालकी क्षेत्रातीलच वृक्षांना लागू होतात.

२. यापैकी १९६७ चे नियम हे महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५ अन्वये केलेले आहेत. वृक्षतोड अधिनियम हा महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कोणत्याही तरतुदीखाली केलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६चे कलम २५(२) चा दाखला १९६७ चे नियमा खालील तरतूदीनुसार मागणी केलेल्या वृक्षतोडीस लागू होतो व तसा कलम २५ (२) चा दाखला वृक्षतोड अधिनियमाखाली मागणी केलेल्या वृक्षतोडीस लागू होत नाही.

३. वृक्षतोड अधिनियमाखालील तरतुदीनुसार फक्त निर्बंधीत वृक्षतोडीकरिता वृक्ष अधिकारी तथा संबंधित वनक्षेत्रपाल यांचेकडे अर्ज करावा लागतो. तो अर्ज महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम २५ (२) चा विचार न करता,पण वृक्षतोड अधिनियमाचे कक्षेत राहून निकाली करुन वृक्षतोडीस परवानगी द्यावी लागते अगर नामंजूर करावा लागतो.

४. जर अर्ज १९६७ चे नियमाखाली वृक्षतोडीस केला असलेस तो अर्ज १९६७ चे नियमानुसार मंजूर करावा लागतो अगर नामंजूर करावा लागतो. असा १९६७ चे नियमाखालील अर्ज फक्त संबंधित तालुकयाचे तहसिलदार यांचेकडे करावा लागतो व तो अर्ज त्यानी १९६७ चे नियमानुसार मंजूर करावा लागतो किंवा नामंजूर करावा लागतो.

५. म्हणजेच १९६७ चे नियमानुसार वृक्षतोडीस संबंधित तालुक्याचा तहसिलदार यांचेकडे वृक्षतोडीस परवानगी मागता येते व ती परवानगी दिलेस ती महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५ (२) नुसार दाखला मिळाला असे म्हणतात. जर तो अर्ज नामंजूर केलेस म्हणजेच वृक्षतोडीस परवानगी नाकारलेस कलम २५(२) नुसार दाखला मिळाला नाही असे म्हणतात व १९६७ चे नियमानुसार वृक्षतोडीस परवानगी मिळाली नाही असे म्हणतात.

६. १९६७ चे नियमानुसार ठराविक / विशिष्ट मालकी क्षेत्रातीलच निर्बंधीत अगर अनिर्बंधीत वृक्षतोडीस परवानगी मिळते. कारण १९६७ चे नियमात वृक्षांची व्याख्या दिलेली नाही. वृक्षतोड अधिनियमात वृक्षाची व्याख्या निर्बंधित वृक्ष अशी त्या अधिनियमाचे कलम २ (फ) मध्ये दिलेल आहे.

७. पण १९६७ चे नियमानुसार फक्त ठराविक / विशिष्ट मालकी क्षेत्रातीलच वृक्षतोडीस तहसिलदार परवानगी देऊ शकतात ते ठराविक / विशिष्ट मालकी क्षेत्र त्यातील नियम २ (१) व (२) नुसार दोन प्रकारचे आहेत.

अ. नियम २(१) नुसार सर्व प्रकारचे ओढे, नद्या, लहान ओढे व नाले ज्यामध्ये मान्सून मध्ये किंवा इतर वेळी पाणी साचते आणि ज्यामध्ये नियमितपणे डिसेंबर अखेर पाणी राहाते. पण त्यामध्ये लहान तात्पुरते पाण्याचे आहोळ याचा समावेश होत नाही.

ब. नियम २(१) मध्ये न मोडणारे पण मशागत न करण्यायोग्य व आर्थिक दृष्ट्या जमिन कसणे शक्य नाही. अशा क्षेत्रातील वृक्ष संख्या एकरी २० पेक्षा कमी असतील असे क्षेत्र.

८. वर परिच्छेद ७ मध्ये नमूद केलेल्या मालकी क्षेत्रातीलच वृक्षतोडीकरिता संबंधित तहसिलदार यांचेकडे अर्ज करावा लागतो व त्यास परवानगी मिळालेस महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५(२) प्रमाणे दाखला मिळाला असे म्हटले जाते.

९. पण परिच्छेद ७ मधील मालकी क्षेत्राव्यतिरिक्त इतर मालकी क्षेत्रातील फक्त निर्बंधित वृक्षतोडीस परवानगी मिळणेकरिता वृक्षतोड अधिनियमाचे तरतुदीनुसार संबंधित वृक्षअधिकारी तथा वनक्षेत्रपाल यांचेकडे अर्ज करावा लागतो व निर्बंधित वृक्षतोडीस परवानगी देणेकरिता महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५(२) नुसार दाखल्याची आवश्यकता नाही.

१०. शिवाय परिच्छेद ७ मधील मालकी क्षेत्राबाहेरील अनिर्बंधित वृक्षतोडीस वृक्षअधिकारी अगर तहसिलदार यांचेकडे अर्ज करणेची आवश्यकता नाही. म्हणजेच महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५(२) नुसार त्याकरिता दाखल्याची आवश्यकता नाही.

११. आपले पत्रात खालील दोन मुद्द्यावर मार्गदर्शन मागितलेले आहे.

अ. वृक्ष अधिकारी तथा वनक्षेत्रपाल यांना निर्बंधित झाडांचे वृक्षतोड / निर्गतीस परवानगी देणेसाठी २५/२ चे दाखल्याची आवश्यकत आहे का?

ब. वृक्ष अधिकारी तथा वनक्षेत्रपाल / उपवनसंरक्षक यांना अनिर्बंधीत झाडांचे निर्गतीस परवानगी देणेसाठी २५/२ चे दाखल्याची आवश्यकता आहे का?

१२. वरील मुद्दा (अ) व (ब) वर माझे मत वर नमूद कारणाकरिता नकारार्थी आहे.

१३. वरील मुद्दा (ब) करिता --- वाहतूक होणा-या लाकडाकरिता महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ चे नियम ४७ व ४८ नुसार शासकीय वाहतूक चिन्ह असले पाहिजे. १९६७ चे नियमाबाहेरील मालकी क्षेत्रातील वृक्षतोड असेल तर त्यास २५(२) दाखल्याची आवश्यकता नाही. पण वृक्षतोड १९६७ चे नियमाव्यतिरिक्त मालकी क्षेत्रातील असेल तर त्याची शहानिशा संबंधीत वन अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन करावी.

(कु.द.पाटील)
विधी सल्लागार,
कोल्हापूर वनवृत्त, कोल्हापूर

कोल्हापूर,
दिनांक ९/१२/२०१५

प्रतिलिपी :- मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांना माहितीसाठी.

d:\d\k.d.patil letter\पत्र विधीसल्लागार.docx

Scanned with OKEN Scanner